दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १०९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१९ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# शेकापचा अमृतमहोत्सवी वर्धापन दिन यशस्वी करा : आस्वाद पाटील




**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेतकरी कामगार पक्षाचा ७५ वा वर्धापन दिन वडखळ येथे येत्या २ऑगस्टला उत्साहात साजरा करण्यात येणार असून अमृतमहोत्सवी वर्षातला हा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यासाठी सहभागी व्हा,असे आवाहन जिल्हा चिटणीस ॲड.आस्वाद पाटील यांनी सोमवारी( १८ जुलै) पनवेल येथे केले.

पनवेल येथे शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ता बैठक आयोजित करण्यात आली होती. माजी आमदार धैर्यशील पाटील, आम. बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, सुरेश खैरे, प्रदीप नाईक, मुंबई कृषिउत्पन्न बाजार समिती सदस्य राजेंद्र पाटील, पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, पनवेल कृषिउत्पन्न बाजार समिती सभापती डॉ. दत्तात्रय पाटील, नारायणशेठ घरत, नगरसेवक शंकर म्हात्रे, नगरसेवक गोपाळ भगत, नगरसेवक रविंद्र भगत, रायगड जिल्हा परिषद सदस्य विलास फडके,ॲड. सचिन जोशी आणि पन–वेल मधील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी ॲड.आस्वाद पाटील म्हणाले की, या वर्धापन दिनाला तालुका प्रमाणे बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहोत. ते पुढे म्हणाले या पुढे ज्यांना नावाने निमंत्रण येईल त्यांनीच बैठकीला यावे जेणेकरून पक्षाची शिस्त मोडली जाणार नाही. आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले वर्धापन दिनानिमित्त आपण प्रतिज्ञा करूया की. येणार्या पनवेल महानगर पालिकेवर शेकाप चा झेंडा फडकवू. तसेच गेल्या वर्षी सांगली आणि कोल्हापूर या ठिकाणी महा–पूर आला होता तेव्हा आपण शेकाप तर्फे भरीव काम केली आहेत. गेल्या वर्षी आपला वर्धापन दिन उरण येथील फुंडे हायस्कुल येथे मोजक्या कार्यकर्त्यांत साजरा केला परंतु ओनलाईन मध्ये सुमारे २००००, नागरिकांनी भाग घेतला होते.

या वर्धापन दिनी पनवेल मधील सर्वांनी शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात येऊन येथे झेंडावंदन करून पुढे जायचे आहे असे सांगितले .या वेळी शेतकरी कामगार पक्ष पनवेल विभागाच्या वतीने वर्धापन दिनासाठी पाच लाख रुपयाचा निधी जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील यांच्याकडे संपूर्द करण्यात आली प्रास्ताविक पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी यांनी केली.तर आभार प्रदर्शन शेतकरी कामगार पक्षाचे विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाले किल्ल्यात भाजपचा सुरुंग

## रहाटाड ग्रामस्थांनी कमळाचा झेंडा घेतला हातात



**दै.रायगड नगरी । तळा**

राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होऊन म.वि.आ ला धक्का दिला. शिंदेसेना भाजपचे सरकार स्थापन झाले असून स्थानिक पातळीवर देखील मोठ्या प्रमाणावर तशीच काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील रहाटाड राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या गावात भाजपने खिंडार पाडले. रहाटाड गावाने ग्रामपंचायत सदस्या सह भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

त्यावेळी उपस्थित महाराष्ट्र प्रदेश सचिव रविभाऊ मुंढे, तळा तालुका भाजप अध्यक्ष ॲड.निलेश रातवडकर, तळा तालुका अध्यक्ष महिला मोर्चा सौ.प्रमिला चोरगे, मा.नगराध्यक्षा सौ.रेश्मा रवि मुंढे, तळा नगरसेवक तथा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रितेश रवी मुंढे, यांच्या हस्ते भाजपचा झेंडा हातात घेतला. यावेळी युवा वॉरिअर्स जिल्हा संयोजक कु. संकेत नाकरेकर, बेटी बचाव बेटी पढाव जिल्हा संयोजिका निलीमा विशाल मुंढे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष वैभव कदम, शक्तीकेंद्र अध्यक्ष मोरेश्वर गोरीवले, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुयोग बारटक्के, युवा मोर्चा शहर उपाध्यक्ष अनिरूध्द काणेकर, विकी जंगम, सुबोध भौड, उर्मिला मुंढे,

.../२

# फडके नाट्यगृहात महापालिकेच्यावतीने 'सिंगल युज प्लॅस्टिक' बंदीवर कार्यशाळा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिनियमानूसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या कायद्यानुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये 'सिंगल युज प्लॅस्टिकवरती' संपूर्णत: बंदी घालण्यात आली आहे. या प्लॅस्टिकंबदीची सविस्तर माहिती महापालिका क्षेत्रातील व्यापारींना व नागरिकांना व्हावी यासाठी पनवेल महापालिकेच्यावतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या निर्देशानूसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'सिंगल युज प्लॅस्टिक' बंदीवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपायुक्त सचिन पवार, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे रायगड जिल्ह्याचे प्रादेशिक अधिकारी व्हि. व्हि. किल्लेदार, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, क्षेत्रीयअधिकारी ए.एस लोहिया, योगेश देशमुख, मीना पवार, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरीक्षक शैलेश गायकवाड, सर्व स्वच्छता निरीक्षक,स्वच्छता विभागातील अधिकारी, पनवेल,कळंबोली, कामोठे येथील व्यापारी संघटनेचे पदाधिकारी, हॉटेल असोशिएशन, प्लॅस्टिक विक्रेता असोशिएशनचे पदाधिकारी , नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी उद्यापासून पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात 'सिंगल युज प्लॅस्टिक' बंदीवरती कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून व्यापारी वर्गासाठी प्रबोधनपर मार्गदर्शक माहितीपट दाखविण्यात आला. तसेच 'सिंगल युज प्लॅस्टिक' बंदी कायद्याविषयी माहिती सांगण्यातआली. सिंगल युज प्लॅस्टिकमध्ये कोणकोणत्या वस्तूंचा समावेश होतो हे सांगण्यात आले. तसेच व्यापाऱ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले.

महापालिकेच्या वतीने उद्यापासून पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात 'सिंगल युज प्लॅस्टिक' बंदीवरती कडक कारवाई करण्यात येणार आहे. सिंगल युज प्लॅस्टिक मध्ये कोणकोणत्या वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे,कोणकोणत्या वस्तूंना परवानगी देण्यात आली आहे, याविषयावरती आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तळ मजल्यावरती प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा लाभ विद्यार्थी , नागरिक, व्यापारीवर्गाने घ्यावा असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

# पाली अंबा नदी पुलाची दैना ; रेलिंग तुटल्या, खड्डे, चिखल

## प्रवास धोकादायक, अपघाताचा वाढला धोका



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे येथील अंबा नदी दुथडी भरुन वाहत आहे. अनेकदा या नदिने धोक्याची पातळी ओलंडली.

त्यामुळे मागील आठवड्यात वाकण पाली राज्य महामार्गावरील पाली अंबा नदि पुलावरून ४ ते ५ वेळा पाणी गेले. यामुळे पुलाचे लोखंडी संरक्षक कठडे तुटले आहेत. शिवाय पुलावर मोठाले खड्डे पडले आहेत. पुलाच्या एका बाजूला चिखल व राडारोडा पसरला आहे. यामुळे येथून प्रवास करणे धोकादायक झाले आहे. तसेच वाहन चालक आणि पादचाऱ्यांची खूप गैरसोय होत आहे.

वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील पाली येथील अंबा नदी पुल मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडतो. तसेच दक्षिण कोकणातून पुणे व मुंबईला मुंबई–पुणे द्रुतगतीमार्गाने जाणारे प्रवाशी, वाहने व मालवाहू वाहने याच मार्गावरून जातात. येथून मोठ्या प्रमाणात प्रवासी व अवजड वाहनांची वाहतुक होते.

.../२

## संक्षिप्त...

### शिवसेनेला आणखी एक मोठा धक्का

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसला होता. तसेच ४० हून अधिक आमदार शिंदेसोबत गेल्याने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. दरम्यान, शिंदेंच्या बंडानंतर शिवसेनेतून अनेक नेते आणि शिवसैनिक शिंदेंना समर्थन देत आहेत. त्यातच शिव–सेनेला आज अजून एक मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिला आहे.

रामदास कदम हे गेल्या काही काळापासून पक्षात नाराज असल्याची चर्चा होती. त्यातच त्यांचा विधान परिषद आमदारकीचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांना पुन्हा संधी मिळाली नव्हती. तेव्हापासून ते शिवसेना सोडणार असल्याची चर्चा सुरू होती. मात्र आपण अखेरपर्यंत शिवसेनेतच राहणार, असे त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र आज त्यांनी शिवसेना नेतेपदाचा राजीनामा दिल्याने आता त्यांची पुढची वाटचाल काय असेल याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर रामदास कदम यांचे पुत्र योगेश कदम यांनीही उद्धव ठाकरेंची साथ सोडत शिंदे गटात प्रवेश केला होता. मात्र तेव्हा रामदास कदम हे उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत राहिले होते. त्यातच योगेश कदम यांच्या नेतृत्वात त्यांचे प्रभावक्षेत्र असलेल्या गुहागर–दापोली भागातील अनेक नगरसेवकांनी हल्लीच शिंदे गटात प्रवेश केला आहे.

# विविध मागण्यांसाठी महावितरणच्या कॉन्ट्रॅक्टर संघटनेचे पेण येथे धरणे आंदोलन




**दै.रायगड नगरी । पेण**

निसर्ग वादळ असो की तोकते वादळ असो मागच्या अनेक वर्षांपासून महावितरण कंपनीच्या समस्या सोडविण्यासाठी एमएसईबीचे कॉन्ट्रॅक्टर दिवस रात्र मेहनत घेऊन जनतेच्या समस्या सोडवित असतात. मात्र कित्येक महिने होऊन गेले तरी महावितरण कंपनी संबंधित कॉन्ट्रॅक्टरांची थकलेली बिल अदा करीत नसून यासह अनेक विविध मागण्यांसाठी सोमवार दि.१८ जुलै रोजी रायगड जिल्ह्यातील इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर्स वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने पेण येथील मुख्य कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या धरणे आंदोलनात असोसिएशनच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये महावितरणाने पॅनेलमेंट टेंडर २०१९ मध्ये सर्व प्रकारच्या टेंडरला कामासंबंधीचे मटेरियल कॉस्ट डाटा व लेबर शेडूल रेट यामध्ये तीन वर्षापासून कोणतीही वाढ केली नसून यासह शासनाच्या जीआर नुसार ३१ मार्च २०२२ रोजी प्रिव्हेन्टीव्ह मेंटेनन्स ब्रेकडाऊन मेंटेनन्स व एनसीसीच्या टेंडरची मुदत संपलेली असताना सुद्धा आपल्याकडून तीन महिन्यासाठी देण्यात आले आहे. यात महावितरणाने संबंधित कॉन्ट्रॅक्टर यांच्याशी चर्चा करणे गरजेचे होते. मात्र यात कॉन्ट्रॅक्टर ना धमकविण्याचा प्रयत्न केला जातो, तो तात्काळ थांबवावा. यासह आमच्या अनेक मागण्या अजून प्रलंबित आहेत.

रायगड जिल्ह्यातील असणारे कॉन्ट्रॅक्टर महावितरणाच्या अडचणी सोडवण्यासाठी दिवस–रात्र काम करीत असताना सुद्धा वरिष्ठ कार्यालयामार्फत मागील अनेक महिने पेमेंट अदा केले जात नाही. याबाबत वारंवार वरिष्ठ कार्यालयाला निवेदन देऊनही याकडे संबंधित कार्यालय डोळेझाक करीत असल्याने रायगड जिल्हा इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले आहे. त्यामुळे महावितरणाने सदर कॉन्ट्रॅक्टरांच्या सर्व मागण्या तातडीने न

.../२

# विविध विकासकामांचे भूमिपुजन आणि लोकार्पण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभाग क्र १८ मधील पाडा मोहल्ला येथील अंतर्गत गल्ली काँक्रीटीकरण करणे आणि भुसार मोहल्ला येथील गटार बांधणे हे काम सहकारी नगरसेवकांसह विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी सातत्याने पाठपुरावा करून काम मंजूर करून घेतले. या कामाचे भूमिपूजन पार पडले.

तसेच प्रभाग क्र १८ मधील नवीन पनवेल सेक्टर ३ येथील प्लॉट नं.५६ येथील उद्यानात विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीचा वापर करून बांधण्यात आलेल्या विरंगुळा केंद्राचे व नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर यांच्या नगरसेवक निधीतून नवीन पनवेल सेक्टर ३, प्लॉट ५७ येथील उद्यानात बांधण्यात आलेल्या विरंगुळा केंद्राचे लोकार्पण पार पडले. यावेळी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, नगरसेविका प्रीती जॉर्ज, नगरसेविका सारिका भगत, माजी नगरसेवक डी. पी.म्हात्रे, शेकापनेते प्रभाकर कांबळे, युवा नेते अतुल भगत, मंगेश अपराज, अविनाश मकास, दर्शन कर्डीले, रोहन गावंड, संदेश मोहन तसेच जेष्ठ नागरिक, सहकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदे–शाने रायगड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

भरत पाटील – उपजिल्हाप्रमुख (पनवेल विधानसभा), एकनाथ म्हात्रे – महानगरप्रमुख (पनवेल महानगर क्षेत्र), दीपक घरत–महानगर समन्वयक (पनवेल महानगर क्षेत्र), रामदास गोंधळी, उपमहानगरप्रमुख (खांदा कॉलनी), प्रकाश गायकवाड, उपमहानगरप्रमुख (खारघर), यतिन देशमुख– शहरप्रमुख (नवीन पनवेल), प्रवीण जाधव – शहरप्रमुख (पनवेल शहर), गुरुनाथ पाटील – शहरप्रमुख (खारघर), प्रदीप केणी – शहरप्रमुख (तळोजे), प्रदीप ठाकूर विधानसभा समन्वयक (पनवेल) यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे.

# ५४ व्या मि.एशिया बॉडीबिल्डिंग कॉम्पोटीशनमध्ये सुभाष पुजारी यांनी पटकावले सुवर्णपदक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

५४ वी मि.एशिया बॉडीबिल्डिंग कॉम्पोटीशनमध्ये पळस्पे महामार्ग पोलिसचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी सुवर्णपदक पटकावल्याने पोलीसदलांसह पनवेलकरांनी आनंद व्यक्त केला आहे.

मालदीव येथे ५४ वी मि.एशिया बॉडीबिल्डिंग कॉम्पोटीशन २०२२ स्पर्धा सुरु असून दि.१५ ते २१ जुलै दरम्यान चालणाऱ्या या स्पर्धेत आज रोजी ८० किलो गटा मध्ये पळस्पे महामार्ग पोलिसचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी सुवर्णपदक सुवर्णपदक पटकावले आहे. त्यांच्या या यशाने महाराष्ट्र पोलीस दलाचे व भारत देशांचे नाव उंचावले आहे. सुभाष पुंजारी यांच्यावर पोलीसदलांसह पनवेलकरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# न्यायाचे मृगजळ

मोदी सरकारला आठ वर्षे झाली. हा कालावधी छोटा नाही. संसदेतील आकडेवारीनुसार देशात जिल्हा आणि इतर कनिष्ठ न्यायालयांमध्ये २८ मार्च, २०२२ रोजी चार कोटी नऊ लाख ८५ हजार ४९० खटले प्रलंबित होते. उच्च न्यायालयांमध्ये मिळून ५९ लाख खटले आहेत. सर्वोच्च न्यायालयातील तुंबारा ७० हजार खटल्यांचा आहे. 'खटले निकाली काढणे हे न्यायव्यवस्थेचे काम असून त्यात सरकारची काही भूमिका नाही,' असेही ही आकडेवारी देताना संसदेत सांगण्यात आले. हे अर्धसत्य आहे. खटले वेगाने चालविणे, हे न्यायालयांचे काम असले आणि ते सध्या कार्यक्षमतेने होत नसले तरी या साऱ्या प्रक्रियेत सरकारची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. उदाहरण घ्यायचे तर, मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचा पट ९४ आहे. यातील ३९ पदे रिक्त होती. नऊ नवीन न्यायमूर्तींची नावे सरकारने नुकतीच मंजूर केली. याचा अर्थ, आजही तीस पदे रिकामी आहेत. हीच कथा देशातील बहुतेक उच्च न्यायालयांची तसेच इतर कनिष्ठ न्यायालयांची आहे. ही पदे भरणे, राज्य सरकारांशी चर्चा करून न्यायव्यवस्थेला आवश्यक त्या सुविधा पुरवणे, हे काम केंद्राचे नाही का? ते आठ वर्षांत कार्यक्षमतेने झाले असते तर प्रलंबित खटल्यांचा फुगवटा इतका वाढला नसता. केंद्र सरकार सातत्याने कालबाह्य कायदे रद्द केल्याचे सांगत असते. मोदीही हे सांगत असतात. हा प्रयत्न स्तुत्य आहे. अजूनही बरेच कालबाह्य कायदे जायला हवे आहेत. मात्र, या प्रक्रियेचे प्रत्यंतर सामान्य नागरिकांना वेगवान न्यायदानातून यावे. तसे ते होताना दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायमूर्ती उदय लळीत हे लवकरच सरन्यायाधीश होतील. त्यांनी परवा साडेनऊलाच सुनावणी सुरू केली. न्यायालये दहा ते साडेदहाला काम सुरू करतात. 'मुले सकाळी सातला शाळेत जातात; तर न्यायालयांनी नऊला काम सुरू का करू नये?' हा त्यांचा प्रश्न योग्य आहे. आता हे करून दाखविण्यची संधी त्यांना मिळणार आहे. ती त्यांनी जरूर घ्यावी आणि मुख्य म्हणजे जो पदकाळ मिळेल, त्यात न्यायमूर्तींची रिक्त पदे भरण्यासाठी मोहीम आखावी. सन २००० मध्ये अकराव्या वित्त आयोगाने थकलेल्या खटल्यांचा निकाल लागावा, यासाठी पाच वर्षांसाठी जलदगती न्यायालये स्थापण्याची भूमिका घेतली. आज जलदगती न्यायालये ही प्रस्थापित व्यवस्थेचा भाग बनली असून तेथील प्रलंबित खटले दहा लाखांहून जास्त आहेत. 'आता ही यंत्रणा कायमस्वरुपी करा' असे सर्वोच्च न्यायालयाला शेवटी राज्यांना सांगावे लागले. म्हणजे, व्यवस्थेवरचा जालीम इलाज व्यवस्थेनेच गिळून टाकला. न्यायालयांच्या इमारती, दालने, संगणक अशी सारी यंत्रणा हाताशी असताना सरकारने निदान उत्तर भारतात तरी न्यायाधीश व इतर कर्मचाऱ्यांची संख्या दुप्पट करून दोन आणि गरज असेल तर तीन शिफ्ट्समध्ये न्यायालये का चालवू नयेत? काही दिवसांपूर्वी सरन्यायाधीश रामणा आणि कायदेमंत्री किरण रिजिजू हे ज्या निमित्ताने एका व्यासपीठावर आले, ती 'नॅशनल लिगल सर्व्हिस अ‍ॅथॉरिटी' स्थापन होऊनही बराच काळा लोटला. निराधार, गरीब कैद्यांना कायदेशीर मदत देणे आणि देशात लोकन्यायालये चालविणे, हे या संस्थेच्या स्थापनेचे मुख्य उद्देश होते. मात्र, देशभरात दोन वर्षांपूर्वी जे चार लाख ८८ हजार ५११ कैदी तुरुंगात होते; त्यातील तीन लाख ७१ हजार ८४८ कच्चे कैदी होते. म्हणजे, त्यांच्यावर गुन्हा सिद्धच झाला नव्हता. हे प्रमाण एकूण कैद्यांच्या ७६ टक्के आहे. यातले बरेचसे अर्धशिक्षित, निरक्षर तसेच समाजातील मागास जातींचे होते. यातल्या गंभीर गुन्ह्यांतील संशयितांना सोडून इतरांना त्वरेने जामीन का मिळू नये? स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यांनीच यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन आता केले जात आहे. पूर्वी संस्थानी कारभारात कैद्यांना राजांच्या वाढदिवसाला माफी मिळत असे. तसे अवडंबर करण्यापेक्षा ही व्यवस्थाच कायमची भक्कम, उत्तरदायी करायला नको का? देशातील लक्षावधी दिवाणी किंवा मुलकी खटल्यांचे तर विचारायलाच नको. अनेकांची हयात जाते, टाचा घासून माणसे मरतात, पिढ्या उद्ध्वस्त होतात, घरे देशोधडीला लागतात पण खटल्यांचे निकाल काही लागत नाहीत. तुंबलेले खटले आणि सकल राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) संभाव्य घट, असे हिशेब मांडले जातात. ते तर नुकसान आहेच. त्याहीपेक्षा अकार्यक्षम, अजगरी न्यायव्यवस्थेमुळे भारतीय समाजावर वेदना, दु:ख, प्रतीक्षा आणि स्वप्नांचा चक्काचूर असा जो आघातांचा प्रपात गेली सात दशके कोसळतो आहे; त्या शोकांतिकेचे मूल्य काय आहे? ते कोणी मांडले आहे आणि या वेदना दूर केल्या आहेत? लोकशाहीचा एकेक स्तंभ हा समाजाचा आधारस्तंभ व्हायला हवे. त्याने मुखस्तंभ बनू नये. पण सगळे उलटेच चालले आहे.

# वनविभाग माणगांव व श्रृंखला टिमने पन्हळघरच्या जंगलात १०,००० सिडबॉल टॉसिंग केले

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

अनेकदा जंगलातून वणवे लागून आमची जंगलं वनसंपदा, वनराई व हिरवेगार डोंगर काही क्षणांत उध्वस्त होतात. वृक्षारोपण करुन जंगल वाढवणे या सगळ्या प्रयत्नांतून आपण वसुंधरेचे संतुलन कायम राखण्याचा छोटासा प्रयत्न करतो. याच धर्तीवर शनिवार दि.१६ जुलै २०२२ रोजी श्रृंखला टीमने, जोडो इंडिया व वन विभाग परिक्षेत्र रोहा माणगांव यांच्या संयुक्त विद्यमाने पन्हळघर येथे सीडबॉल टॉसिंगचा कार्यक्रम घेतला.




माणगांवच्या शिक्षण प्रसारक मंडळ गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मिडीयम स्कूल मधिल नववी दहावीच्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन श्रृंखलाच्या संस्थापक अस्मिता शर्मा यांनी कर्जतच्या आदिवासी बांधवांकडुन दहा हजार सीडबॉल बनवून घेत, त्यांना आर्थिक सक्षमीकरण ही दिले. आणि आज तेच सीडबॉल फॉरेस्ट अधिकारी रूपाली पवार, सुनिता वडजे, अनिल मोरे, नरेंद्र पालकर, जितेंद्र राऊत यांचे सोबत माणगांव टीम मधून हर्षाली काळे, केतकी धामणकर तसेच महाड टीम मधून निहार वडके, तन्मय मेहता, ममता मेहता उपस्थित होत्या.

खारघर टीम मधून गायत्री, अस्मिता शर्मा, रुफिना, दीपक तेटगुरे यांनी वॉटर कंझर्वेशन अँड सिक्युरिटी याबद्दल मुलांना तसेच उपस्थित टीमला सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे अस्मिता शर्मा यांनी सीडबॉल बनविण्याचे प्रात्यक्षिक घेऊन, सीडबॉल टॉसिंग का गरजेचे आहे ? याबद्दल उपस्थितांना माहिती दिली.

फॉरेस्ट ऑफिसर यांच्या मदतीने पन्हळघर मधील आदिवासी बांधवही उत्साहाने या कार्यक्रमात सामील झाले. अशाप्रकारे लोणेरे जवळील पन्हळघर येथील राखीव जंगलात आज दहा हजार सीडबॉल टॉसिंग करण्यात आले आहेत.

हा उपक्रम खुपच स्तुत्य असुन प्रत्यक्ष वृक्षारोपण करण्याऐवजी जंगलात दूरवर बीया (सीडबॉल) विशीष्ठ मातीचे लेपण करुन गोलाकार चेंडु प्रमाणे बनवुन त्या जंगलात दूरवर फेकणे व नैसर्गिक रित्या त्या रुजुन कालांतराने उजाड जंगलात पुन्हा वनराई रुपांतरीत होतानाचे महत्वाचे कार्य आहे.

# पुराचे पाणी घरात घुसल्याने लाखोंचे नुकसान; तहसीलदार विजय तळेकर यांनी केली पाहणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पारगाव व डुंगी गावात विमानतळाला दगड मातीच्या भरावामुळे पावसाचे पाणी जाऊन पुरपरिस्थीती निर्माण झाली. यासंदर्भात तहसीलदार विजय तळेकर यांनी पाहणी केली.

ग्रामपंचायत पारगांव हद्दीतील पारगांव व डुंगी गावात आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दगड व मातीच्या भरावामुळे सन २०१७/१८ पासुन ते आजतागायत पावसाच्या पाण्याने पुरपरिस्थीती निर्माण होत आहे. अनेक घरांमध्ये पाणी आऊन घराचे नुकसान होत आहेत. याबाबत जिल्हाधिकारी यांच्यासोबत अलिबाग येथे झालेल्या बैठकीत सिडकोचे अधिक्षक अभियंता गोसावी, कार्यकारी अभिनेता गुजराती आणि सहाय्यक अभिनेता वसुले यांनी या वर्षी पारगांव व डुंगी गावांत पाणी जाणार नाही तशी उपाय योजना केली असल्याचे सांगितले. परंतु या वर्षाच्या पहिल्याच पावसात दोन्ही गावात पुरपस्थिती निर्माण हाऊन अनेक घरात पाणी गेले आहे. पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी प्रत्यक्ष गावात येऊन पाहणी केली असता गावात पाणी गेल्याने नुकसान झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सिडकोने केलेली उपाययोजना पूर्णतः असफल झाल्याचे दिसुन येत असून होणाऱ्या वित्त व जीवीतहानीस पुर्णत सिडको जबाबदार असल्याचे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे. यावेळी पारगांव सरपंच नाईक, उपसरपंच सौ निशा पाटील, मा. उपसरपंच मनोज दळवी, मा. उपसरपंच रत्नदीप पाटील, मा. उपसरपंच सुशिलकांत तारेकर व तलाठी श्यामा पवार, ग्रामविकास अधिकारी मोरेश्वर मोकळ उपस्थित होते.

# बातमी प्रसिद्ध होताच विहूर पुलावरील खड्डे बुजले



**दै.रायगड नगरी । मुरुड**

गेली चार पाच दिवस पडलेल्या पावसामुळे मुरुड तालुक्यातील मुरुड–साळाव रस्त्यावरील विहूर पुलावरील खड्ड्यांमुळे अपघात होत असल्याचे वृत्त वृत्त पत्रातून प्रसिद्ध होताच सार्वजनिक बांधकाम खात्याने दखल घेत पुलावरील खड्डे बुजविण्यात आले आहे.

मुसळधार पावसामुळे याठिकाणी रस्त्यांना खड्डे पडले असून अपघातांची मालिका सुरुच आहे. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात अलिबाग–मुरुड राज्य मार्गावरील विहूर नदीवरील पुलाचा एक भाग वाहून गेला होता. त्या वेळी वाहतूक बंद पडली होती. या पुलावरील मोठं मोठे खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. हे वृत्त दि. १२ जुलै रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर दि. १८ रोजी सा.बा. वि. विहूर पुलावरील खड्डे बुजविण्यासाठी लगबग सुरू झाली असून सा. बां. विभागाने एकेरी वाहतूक मजबुतीकरण आणि सुरु केली होती. मात्र, डांबरीकरण पावसाळा आला तरी झालेच नाही. पुलाच्या रस्त्यावरील संरक्षण भिंतीचे बांधकाम अजूनही झालेले नाही. उलट पुलावरील रस्त्यावर अधिक मोठे खड्डे पडून अपघात घडत आहेत. अधिक पाऊस पडल्यास या पुलाचा भराव वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाहीं तरी रस्त्याची संरक्षक भिंत लवकरात लवकर बांधावी अशी मागणी सर्वस्तरातून होत आहे.

# श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथील किनाऱ्यालागतच्या घरांमध्ये समुद्राच्या भरतीचे पाणी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

सर्वत्र पावसाचा कहर सुरू असून समुद्र चांगलाच खवळलेला असून समुद्राच्या पाण्याच्या पातळीत देखील वाढ झाली आहे. श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथील समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या घरांमध्ये समुद्राच्या भरतीचे पाणी शिरत आहे. त्यामुळे या नागरिकांचं जनजीवन विस्कळीत होत आहे. भरडखोल येथील गृहस्थ महादेव दामा पावशे, सदानंद गणपत पावशे, सुगंदा दामा खोपटकर, भिम हरिचंद्र खोपटकर, जाया बाळ्या चोगले, गहिनीनाथ कृष्णा चोगले, विठ्ठल महादेव भोईनकर, भिम पद्मा चोगले, रोहीदास पद्मा चोगले, महादेव बाळ्या चोगले, कृष्णा बाळ्या चोगले, अनंत बाळ्या चोगले, लक्ष्मण बाळ्या पावशे, भालचंद्र रामा पावशे, कानू पाडुंरंग पावशे, नामदेव पोशा पावशे, महेंद्र महादेव भोईनकर आदींच्या घरात पाणी शिरत आहे.

वादळी वाऱ्याच्या काळात समुद्राच्या भरतीचे पाणी घुसत असून अचानक होणारे वादळ किंवा पावसाळी होणारे वादळ या वेळी प्रशासना कडून नेहमी किनार्यालगत असलेल्या घरातील व्यक्तीना सस्थलांतरित करावे लागते. त्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून किनार्यालगत संरक्षक भिंत, रिटनिंग वाल बांधण्याची मागणी भरडखोल सरपंच दिनेश चोगले यांनी केली आहे.

# जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील विद्युत खांब धोकादायक



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील विद्युत खांब जीर्ण झाला असून धोकादायक स्थितीत आहे. हा खांब बदलण्याची मागणी आरोग्य केंद्रातर्फे महावितरणला करण्यात आली आहे.

या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या निवासस्थानाला लागूनच हा विद्युत खांब आहे. हा खांब खालून गंजला असून त्यामुळे त्याला तेथे मोठे होल पडले आहे. तो केवळ विद्युत तारांच्या आधारावर आहे.

परिणामी येथे दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. यामुळे येथील वैद्यकीय अधिकारी, रुग्ण व कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाले किल्ल्यात भाजपचा सुरुंग

सुनील वाड, समिर रातवडकर, अमोल हाटकर, बाबु लासे, ठाकर गुरूजी व सरपंच श्री चांगदेव रामा पाटिल, उपसरपंच अशोक नारायण खंडागळे, रहाटाड गावचे अध्यक्ष नारायण देवजी बोडेरे, उपाध्यक्ष अंकुश देवजी दर्गे, खजिनदार नामदेव नथुराम करंजे, सेक्रेटरी नथुराम नारायण वरंडे, सह सेक्रेटरी सागर हरिश्चंद्र करंजे मुंबई उपाध्यक्ष गणेश पांडुरंग बोडेरे, सेक्रेटरी प्रकाश गुगले, सह सेक्रेटरी नरेश देवजी बोडेरे, खजिनदार एकनाथ जानु मालुसरे, महिला अध्यक्षा सौ.सुनिता गो.ठाकर, ग्रामपंचायत सदस्या. नलिनी न.वरंडे, खजिनदार भाग्यश्री गणेश बोडेरे, सेक्रेटरी सौ.जयश्री पांडुरंग खेडेकर तसेच समस्त रहाटाड ग्रामस्थ, महिला व मुंबई मंडळ यांनी जाहीर प्रवेश करून राष्ट्रवादीला हादरा दिला.

विद्यमान ग्रामपंचायत राष्ट्रवादी कडेच होती. परंतू अंतर्गत कुरघोडीमुळे विकास कामात अडथळा निर्माण होत असे. हा वाद वरीष्ठाकडे देखील दखल घेतली जात नाही त्यामुळे सरपंच चांगदेव पाटील यांनी काही दिवसांपूर्वी भाजप प्रवेश केला होता. आता मात्र त्यांनी करिश्मा दाखवून संपूर्ण गाव भाजप मत केला असून किंगमेकर ठरले असल्याचे बोलले जात आहे.

## पाली अंबा नदी पुलाची दैना ; रेलिंग तुटल्या, खड्डे, चिखल

मात्र या पुलावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाळ्या आधीच या पुलाच्या मध्यावरील काही लोखंडी संरक्षक कठडे (रेलिंग) तुटले आहेत. आणि आता पुलावरून पाणी गेल्यामुळे इतरही रेलिंग वाहून गेले आहेत. त्यांना आधार देणारे सिमेंटचे काही ठोकळे देखील निसटले आहेत. कमकुवत लोखंडी कठडे, मोठाले खड्डे, क्षमतेपेक्षा अधिक वाहनांची ये–जा, वारंवार पुलावर वाहून येवून साठलेला राडारोडा यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने हा पुल अत्यंत धोकादायक झाला आहे. खड्ड्यात असंख्य वाहने आदळत आहेत. पादचार्यांना देखील पुलावरून जीवावर उदार होऊन वाट काढावी लागते.

## विविध मागण्यांसाठी महावितरणच्या कॉन्ट्रॅक्टर संघटनेचे पेण येथे धरणे आंदोलन

सोडविल्यास भविष्यात आंदोलन तीव्र करण्यात येईल असे इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर्स वेल्फेअर असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष निलेश पाटील यांनी सांगितलंत.

या धरणे आंदोलनाला जिल्हाध्यक्ष निलेश पाटील, कार्याध्यक्ष राजेश सानप, उपाध्यक्ष धनंजय पाटील, उपाध्यक्ष यदुराम धुमाळ, उपाध्यक्ष शिवराम जंगम, अभिजीत जाधव, सचिव भालचंद्र जोशी, खजिनदार दिनेश पाटील, सल्लागार किरण बोरसे आदीसह जिल्ह्यातील कॉन्ट्रॅक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महावितरणाचे अधीक्षक अभियंता आय.ए.मुलाणी यांनी धरणे आंदोलना ठिकाणी भेट देऊन मागण्यांची तात्काळ दखल घेऊन सदर निवेदन वरिष्ठांना पाठविण्यात येणार असल्याचे पत्रकारांबरोबर बोलताना सांगितले.


### जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, मे.शितल कन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा.श्रीमती.शितल बाबर ऑफिस पत्ता : १०१, श्री ओम सद्गुरु को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.१२२, सेक्टर–५०, नेरुळ, नवी मुंबई–४००७०६ यांची परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत माझे अशिल श्री.इर्तीजा अल्लादिन खान, पत्ता : रुम नं.१९, पारिजात को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.–अे–१४, सेक्टर–१२, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड यांनी सिडकोबरोबर त्रिपक्षीय करार करून विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**भूखंड क्रमांक ७७, सेक्टर १४, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्रफळ ४०.०० चौ.मी.**

वर वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे १५ दिवसात खालील पत्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

दि.१८/०७/२०२२
ठिकाण : कळंबोली

**सही/–**
**अ‍ॅड.सुनील एन. मोरे**
**ऑफिस नं.३०६०, बिमा कॉम्प्लेक्स, सेक्टर–के डब्ल्यू सी, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८**
**मो.नं.८३६९४६५७९९**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.गुरुकृपा रियालिटी तर्फे भागीदार १) श्री.राजेश रामजी पटेल, २) श्री.कमलेश भवानजी रायरिया पत्ता : ०१, गुरुकृपा रियालिटी, प्लॉट नं.१९०, सेक्टर–२५, उलवे, नवी मुंबई, यांनी मुळ मालक १) श्री.जयवंत अनंत कोळी, २) श्री.परेश भरत कोळी दोघे रा.तरघर–कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीचा खालील वर्णनाचा भूखंड आमचे अशिल यांनी ५०–५० टक्के तत्वावर विकसनाकरिता घेतलेला असून सदरहू एकूण भूखंडापैकी ५० टक्के भूखंड आमचे अशिलांचे नावे हस्तांतरण करणेचे आहे. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**उलवे, ता.पनवेल, जि.रायगड**
KOM-ICIG-46

| गावाचे नाव | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | २५ | १९० | ३४० चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांचा कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त २१ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.१८/०७/२०२२

**सही/–**
**अ‍ॅड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**

### जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री.सत्यनारायण सोमाणी व श्री.प्रेम सोमाणी यांच्या मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे.

**मौजे : आंबिवलीतर्फे कोतलखलाटी, ता.कर्जत, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| आंबिवली | ३३ | ० | १–११–३० पो.ख.०–१९–२० | ५.९७ |
| आंबिवली | ३४ | ० | ०–४४–३ पो.ख.०–०३–० | ०.४१ |

सदर शेतजमीन ही श्री.सत्यनारायण सोमाणी व श्री.प्रेम सोमाणी ह्या आपल्या आर्थिक गरज भागविण्याकरिता यांस कायमस्वरुपी विक्री करण्याचे ठरविले आहे. सबब कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्टर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधना पासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत आहे असे मानण्यात येईल.

दि.१८/०७/२०२२

**सही/–**
**अ‍ॅड.मारिया कोळी**
**५०१, कासाबॅकां, भूखंड क्र.४५, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई–४००६१४**
**मो.क्र.९८१९०५५६७४**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मनविसे पनवेल महानगर शहर अध्यक्षपदी अनिकेत मोहिते यांची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना अध्यक्ष अमित राज ठाकरे यांच्या आदेशाने अनिकेत अनिल मोहिते यांची पनवेल महानगर शहर अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्ष स्थापनेपासून अनिकेत मोहिते हे एकनिष्ठ असून सर्व सामान्याच्या समस्या सोडवत असतात. कोरोना काळामध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष लक्ष दिले होते. त्यांच्या या निवडीमुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## मांडला येथे मुरुड तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेची सर्वसाधारण सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेची सर्वसाधारण सभा मांडला येथे संघटनेचे अध्यक्ष संतोष मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे तालुका अध्यक्ष संतोष मोरे, उपाध्यक्ष प्रकाश मुंबईकर, नवनिर्वाचित सचीव हरीष सूरती, नवनिर्वाचित खजीनदार सचीन बिरवाडकर, सलागार तथा माजी तालुका अध्यक्ष सुर्यकांत जंगम, ज्येष्ठ सभासद ज्युलियस रुझारियो कार्यकारिणी सदस्य व सर्व सभासद यावेळी उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन सभेला सुरुवात करण्यात आली. यावेळी सचीव हरीष सुरती यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन करण्यात आले. शासन स्तरावर मंजूर सुधारित किमान वेतनाबाबत अध्यक्ष संतोष मोरे यांनी माहिती दिली व शासनाने सुधारित किमान वेतन लागू केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच तालुक्यात सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन, राहाणीमान भत्ता लागू झालाच पाहिजे.याबाबत मरुड तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना एक निवेदन देण्याचे ठरविण्यात आले. अनेक कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी कित्येकवर्ष त्यांच्या खात्यात जमा केलेले नाही.तरी सदरची रक्कम लवकरात लवकर जमा करण्यात यावी. याबाबत सुध्दा एक पत्र देण्यात येणार असल्याचे सांगीतले.

यावेळी कार्यक्रमाचे औचित्य साधून संघटनेतील सागर मालजी यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर हरीष सुरती यांची तर खजीनदार व नियोजक सल्लागार म्हणून सचीन बिरवाडकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सर्व उपस्थितांनी या निवडीचे स्वागत करुन नवनिर्वाचितांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्तविक हरीष सुरती यांनी तर आभार संतोष मोरे यांनी मानले.

# एमएमआरडीएची कामे देखरेखी अभावी होतायत चुकीच्या पद्धतीने ! स्थानिकांमध्ये नाराजी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान सारख्या दुर्गम अशा पर्यटनस्थळाला राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या माध्यमातून १२३ कोटी रुपयांचा भरीव निधी प्राप्त झाल्यामुळे इथली विकास कामे एमएमआरडीए मार्फत मार्गावर दिसत आहेत.परंतु होत असणाऱ्या कामांवर कुणाचाही अंकुश अथवा देखरेख नसल्याने अत्यंत चुकीच्या पद्धतीने अन घाईगडबडीत सर्व ठिकाणी कामे सुरू आहेत त्यामुळे ही कामे फारकाळ तग धरू शकणार नाहीत हे स्पष्टपणे दिसून येत आहे त्यामुळे स्थानिकांमधून नाराजीचे सूर अप्रत्यक्षपणे व्यक्त होताना दिसत आहेत.



एवढया मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध झालेला असताना तो खर्च करतांना प्रामुख्याने नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने कुठल्याही प्रकारे लक्ष केंद्रित केलेले नाही की होणारी कामे कशाप्रकारे पूर्ण होत आहेत याबाबत गांभीर्याने घेतलेले नाही त्यामुळेच ही कामे जास्त काळ टिकू शकणार नाहीत. रस्त्यावर लावण्यात आलेले क्ले पेव्हर ब्लॉक हे चांगल्या दर्जाचे आहेत किंवा कसे याबाबत सुध्दा इथल्या तज्ञ, अतिहुशार राजकारणी मंडळींनी सुध्दा काहीएक स्वारस्य दाखविलेले नाही.

गावाची महत्वाची कामे म्हणजे रस्ते विकास हाच विकास पूर्ण होत असताना त्यावर पक्षीय भेदाभेद न करता गावाच्या हिताच्या दृष्टीने लक्ष देणे गरजेचे होते परंतु तसे झाले नाही श्रेयवाद हाच या गावाला लागलेला शाप असल्याने मैत्रीपूर्वक राजकारण करत गावाला अधोगतीकडे नेण्यास राजकीय मंडळी कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे.होणाऱ्या कामांवर कुणाचाही आक्षेप वा तक्रारी येत नाहीत नागरिकांना एकप्रकारे दिखावा म्हणून तात्पुरता विरोध दर्शवून या कामांकडे राजकारण्यांनी हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्यामुळे एमएमआरडीए ने कामाचा सपाटा सुरू ठेवला होता. निविदेच्या कामातील क्वांटीटी पूर्ण करण्यासाठी अनावश्यक ठिकाणी सुध्दा गॅबियन वॉल बांधण्यात आलेल्या आहेत तर इथे मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असते याची कल्पना असताना सुध्दा पावसाळ्यात पाणी वाहून जाण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे पावसाळी पाणी रस्त्यावरून वाहत होते याकामी वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्याच्या बाजूला असलेले कठडे तोडून पाणी जायला मार्ग मोकळा केला गेला आहे त्यातही जिथे उताराची जागा आहे त्याठिकाणी जागा न करता चढावाच्या ठिकाणी कठडे तोडण्यात आलेले आहेत त्यामुळे आगामी काळात रस्त्याचे क्ले पेव्हर ब्लॉक हे हळूहळू निखळून जाणार आहेत.

एकीकडे नगरपरिषदेचे अधिकारी हा मुख्य रस्ता एमएमआरडीए कडून काम पूर्ण झाल्यावर हस्तांतरित होण्याची वाट पहात आहेत परंतु हे सर्व रस्ते नगरपरिषदेच्या अखत्यारीत येत आहेत याची त्यांना कल्पना नाही का ? एमएमआरडीए च्या ठेकेदारांची हे अधिकारी वर्ग, राजकीय मंडळी पाठराखण तर करीत नाहीत ना ? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.हे ठेकेदार घाईगडबडीत कामे उरकून निघुन जाणार आहेत परंतु भविष्यात ह्याच रस्त्यांची डागडुजी नगरपरिषदेच्या खर्चातून करावी लागणार आहे. यासाठी नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने निदान मुख्य रस्त्याचे काम (टपाल पेटीपासून ) ते पांडे रोड पर्यंत चांगल्या पद्धतीने या ठेकेदारांकडून पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष फिल्डवर असावे.या ठेकेदारांना निदान दोन वर्षे कामाची पूर्ण बिले सुध्दा अदा करू नयेत असे सुज्ञ नागरिक बोलत आहेत.

## नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी अखेर पोलिसांनी खड्डे बुजवले



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसी येथून अंबरनाथ, डोंबिवली कडे जाणाऱ्या रोडवरील आयजीपीएल चौक ते नागझरी गाव या दरम्यानचे रोडचे खड्डे अखेर पोलिसांनी स्वतः रस्त्यावर उतरून बुजवले आहेत.

तळोजा एमआयडीसी येथून अंबरनाथ, डोंबिवली कडे जाणाऱ्या रोडवरील आयजीपीएल चौक ते नागझरी गाव या दरम्यानचे रोड अत्यंत खराब असून चार ते पाच ठिकाणी दीड ते दोन फूट खड्डे होते. ते खड्डे भरण्या बाबत वारंवार एमआयडीसी प्रशासना कडे पाठपुरावा केला परंतु सदर रस्त्याबाबत स्थानिक शेतकरी व एमआयडीसी यांच्यात वाद असल्याने सदर रस्त्याचे काम खोळंबले होते परंतु गेले ८ ते १० दिवसापासून सतत चालू असलेल्या पावसाने पाणी साचल्यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी झाली. सदर वेळी खड्ड्यात कोणीही वाहन चालक गाडी घालत नसल्यामुळे वाहतूक कोंडी होत असे. दररोज सात ते आठ कर्मचारी दोनशे मीटरच्या अंतरावर उभा राहून रोड दुभाजकाचे काम करून वाहनचालकांना पुढे जाण्यास मार्गदर्शन करत असतात. सदर अंमलदार सतत पाण्यात उभे राहून कर्तव्य करत असल्यामुळे अनेक पोलिस कर्मचाऱ्यांना पायाला चिखल्या पडण्याचे विकार निर्माण झाले आहेत म्हणून आज वाहतूक शाखेच्या स्तरावर साधनसामग्री उपलब्ध करून सदर पोलीस अंमलदारांनी तीन ठिकाणचे खड्डे बुजवण्याचे काम केले. या कामामुळे दररोज आपला जीव मुठीत घेऊन जाणारे वाहनचालक यांनी समाधान मानून या वाहतूक पोलिसांचे आभार मानले

## कर्जतमध्ये श्रवण यंत्र वाटप शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भारतीय जनता पार्टी कर्जत विधानसभा, युवक प्रतिष्ठान आणि संकल्प सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रास्त दरात श्रवण यंत्र वाटप शिबिर आयोजित केले होते. याप्रसंगी ६४ लोकांना पाचशे रुपयांमध्ये यंत्र देण्यात आली. इतर रुग्णांची तपासणी करून पुढील उपचारासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी सांगण्यात आले.

या शिबिरास कर्जत मधील लोकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक करून आम्हाला अत्यल्प दरात श्रवण यंत्र मिळाल्या बाबत समाधान व्यक्त केले.. याप्रसंगी मुबंई महापालिकेचे नगरसेवक निल सोमय्या आवर्जून उपस्थित राहिले. त्यांनी ऐका स्वाभिमानाने या मोहिमे अंतर्गत होणाऱ्या या उपक्रमबाबत माहिती दिली. ही श्रवण यंत्रे साधारणपणे बाजारात ९ ते १० हजाराला मिळतात परंतु युवक प्रतिष्ठानने ही मशिन्स परदेशातून खास त्यांचे साठी बनवून घेतली आहेत असे सांगितले. या यंत्राचे ५०० रुपये का घेतो ते सुद्धा सांगितले. याच पैशातून अजुन अनेकांना ऐकू येऊ शकते त्यात आपला खारीचा वाटा असावा यापुढेही कर्जत मध्ये विविध उपक्रम राबाविण्यासाठी मदत करू असे सांगितले. तसेच सुनील गोगटे आणि त्यांच्या सर्व सहकारी भाजप पदाधिकारी यांना शुभेच्छा दिल्या.


अर्जदाराचे वकील
ॲड.मोनिका गणेश पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०४४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०८/२०२२

कै.सुदाम शंकर म्हात्रे मयताचे वारस
श्री.जयराम सुदाम म्हात्रे
वय : ५९ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.६८, म्हात्रे गल्ली, म्हात्रे कुलदैवत मंदिराजवळ, धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीमती.चंद्रभागा सुदाम म्हात्रे
वय : सज्ञान, धंदा : गृहिणी
रा.घर नं.६८, म्हात्रे आळी,
धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.भगवान सुदाम म्हात्रे
वय : सज्ञान, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.६८, म्हात्रे आळी,
धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.ज्ञानेश्वर सुदाम म्हात्रे
वय : सज्ञान, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.६८, म्हात्रे आळी,
धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
४) कै.हरिश्चंद्र सुदाम म्हात्रे मयताचे वारस
४/१) सौ.आशाबाई उर्फ मैनाबाई हरिश्चंद्र म्हात्रे
वय : सज्ञान, धंदा : गृहिणी
रा.घर नं.६८, म्हात्रे आळी,
धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
४/२) श्री.हरेश हरिश्चंद्र म्हात्रे
वय : सज्ञान, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.६८, म्हात्रे आळी,
धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.कृष्णाबाई चंद्रकांत पाटील
(पुर्वाश्रमीची कृष्णाबाई सुदाम म्हात्रे)
वय : सज्ञान, धंदा : गृहिणी
रा.काळुंद्रे, शाळेच्या बाजूला, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.सुदाम शंकर म्हात्रे यांना अर्जदार व सामनेवाला क्र.२ व ३ ही मुले व सामनेवाला क्र.४/१ ही सुन व सामनेवाला क्र.४/२ हा नातू असून सामनेवाला क्र.१ ही पत्नी आहे. तसेच सामनेवाला क्र.५ ही मुलगी आहे. कै.सुदाम शंकर म्हात्रे ह्यांचे निधन दि.०८/०६/२०२० रोजी धाकटा खांदा पनवेल येथे झाले आहे. त्यांची आई कै.जनिबाई शंकर म्हात्रे या यापूर्वीच मयत असून कै.सुदाम शंकर म्हात्रे यांचा मुलगा कै.हरिश्चंद्र सुदाम म्हात्रे सामनेवाला क्र.४ यांचे निधन दि.०२/०८/२००२ रोजी राहत्या घरी झालेले असून अर्जदार व सामनेवाला ह्यांनी कै.सुदाम शंकर म्हात्रे यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं./हिस्सा नं. |
|---|---|---|
| पनवेल | ३३९ | ५०१/१<br>५०८/१<br>५०९/१<br>५३२/३ |
| पनवेल | ३४० | ५०७/४ |
| पनवेल | ३४१ | ५४५/५ |
| पनवेल | ४३१-अ | ७१५/अ/२<br>७१८/२ |
| पनवेल | ४३१-ब | ४९५/३<br>५०२/१<br>५०६/२ |
| पनवेल | ४३१-फ | ४९८/३ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.सुदाम शंकर म्हात्रे यांना मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड वितरित करण्यात येणार आहे. अर्जदार व सामनेवाला हे कै.सुदाम शंकर म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सुदाम शंकर म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१८/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल


## गंध सुरांचा संगीत अकॅडमीमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील नामवंत गायक गणेश भगत यांच्या गंध सुरांचा संगीत अकॅडमी मधिल विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा साजरी केली. गुरुपौर्णिमेच्या निमित्त संगीत अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी गंध सुरांचा संगीत अकादमीचे गुरुवर्य व प्रसिद्ध गायक गणेश भगत, शिक्षिका वर्षा लोकरे, शिक्षक प्रवीण भोपी, अभिषेक नांदगावकर, चंद्रशेखर भोपी, हनूमान पाटील, राजु भोईर यांना शाल, गुलाब पुष्प व भेट वस्तू देऊन गुरु पौर्णिमा साजरी केली. या प्रसंगी उद्योजक भास्कर अंबो फुलवरे, आरटीओचे अधिकारी दीपक उगले तसेच पालक मोठ्या संखेने या कार्यक्रमात सहभागी होते.


अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

**जाहीर नोटीस**

अलिबाग येथील मे.मोटर अपघात न्याया.सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.४२३/२०१९
नि.नं.४३/ड
ने.ता.२४/०८/२०२२

तुळशीदास तुकाराम म्हात्रे वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
२) तुषार तुकाराम म्हात्रे
३) ICICI लोम्बार्ड जनरल इश्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.२ तुषार तुकाराम म्हात्रे
रा.गांधेपाडा चोळे, पो.बेणसे, ता.पेण, जि.रायगड

दि.२०/०६/२०११ रोजी सकाळी १०.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे : अलिबाग शहराच्या हद्दीत, प्राजक्ता हॉटेलच्या कॉर्नरवर, अलिबाग मेन रोडवर, रेवदंडा रोडवर, अलिबाग पोलीस स्टेशन, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या हद्दीत झालेल्या अपघातामध्ये अर्जदार नं.१ व २ यांची आई देवकीबाई तुकाराम म्हात्रे ही मयत झाली आहे. म्हणून सदर कारणाकरिता अर्जदार नुकसान भरपाई मिळविण्याकरिता अर्ज करीत आहेत. सदर कामी मोटार सायकल नं.एम.एच./०६/बी बी/३९२८ चालकाची चुकी होती. म्हणून सदर कारणाकरिता अर्जदार नुकसान भरपाई मिळविण्याकरिता अर्ज करीत आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता रु.५,००,०००/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटर अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२४/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहु अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१३/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग — कोर्टाचा शिक्का — सही/- अधिक्षक (न्या.विभाग) जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग



मे.मुजावर सो.कोर्ट
ॲड.नेहा जाधव

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.३३३/२०१९
नि.नं.३०/ड
ने.ता.२९/०८/२०२२

कै.संजय नामदेव पवार (मयताचे वारस)
१) श्रीमती.संगीता संजय पवार
२) श्रीमती.इंदुबाई नामदेव पवार
३) श्री.प्रतिक संजय पवार — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदाराचे पती कै.संजय नामदेव पवार याचे निधन दि.०३/०१/२०१८ रोजी किंग इडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे झाले. ते राहणार-ए/१०४, प्लॉट नं.४८, गायत्री को.ऑप.हौ.सोसायटी, सेक्टर-११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई येथील कायमचे रहिवाशी होते. मृत्यूसमयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**एसीई को.हौ.सोसायटी, दुकान नं.१२, फ्लॅट नं.५८, सेक्टर-११, खारघर, पनवेल आणि जिजाऊ को.ऑप.हौ. सोसायटी, येथील सदनिका, फ्लॅट नं.५, तळमजला, प्लॉट नं.४, ५, ६ आणि ७, सेक्टर १७ कामोठे, नवी मुंबई, पनवेल यांच्या मालकीचे होते.**

वरीलप्रमाणे कै.संजय नामदेव पवार यांचे कायदेशीर वारसदार आहेत व त्यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते.

त्यासाठी प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारस संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्याने त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावा. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत व दाखविल्यास सदरहू कोर्टावरील यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून यांचा हक्क शाबित दिल्यास सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : १८/०७/२०२२

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल



मे.मुजावर सो.कोर्ट
ॲड.अशोक साबळे

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.९०९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०८/२०२२

श्रीमती.अनिता जनार्दन किर्दत
वय : ४६ वर्ष, भारतीय नागरिक — अर्जदार
विरुद्ध
१) कु.वैभव जनार्दन किर्दत
वय : २६ वर्षे, भारतीय नागरिक
२) कु.विवेक जनार्दन किर्दत
वय : २२ वर्षे, भारतीय नागरिक
अर्जदार व सामनेवाला सर्व रा.वाल्मिक मंदिराजवळ, ३/१६, एकता सो, प्रेम नगर, साकी विहार रोड, पवई, साकीनाका, मुंबई-४०००७२ — सामनेवाला

वरील उल्लेखलेल्या अर्जदार यांनी सदरहू मयत कै.श्री.जनार्दन शिवराम किर्दत यांच्या खालील मिळकतीचा वारसदाखला मिळावा असा अर्ज केला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व सामनेवाला क्र.१ ते २ यांचे वडील कै.श्री.जनार्दन शिवराम किर्दत हे दि.२९/०५/२०२० रोजी कारी, सातारा येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांची सासू व सामनेवाला क्र.१ व २ यांची आजी व कै.श्री.जनार्दन शिवराम किर्दत यांची आई कै.श्रीमती.सिताबाई शिवराम किर्दत हे दि.०९/०१/२०१७ रोजी मु.पो.कारी, ता.जि. सातारा येथे मयत झालेले आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**कै.श्री.जनार्दन शिवराम किर्दत यांची स्वकष्टार्जित स्वमालकीची मिळकती पुढीलप्रमाणे :- फ्लॅट क्र.बी-१६, तिसरा मजला, ज्ञानसाधना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट क्र.६३, सेक्टर क्र.२१, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०., येथील क्षेत्रफळ : ३३९ चौ.फूट त्याचे बाजारमुल्य रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी वीस लाख मात्र) अशी मिळकत आहे.**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर हावून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या रकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.८/०७/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले. हुकूमावरुन

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# कर्जत - पुण्यातील दुर्गप्रेमींनी शोधला 'साबईगड' किल्ला, टेहळणीचा किल्ला असल्याचा निष्कर्ष

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील साबईगड हा डोंगरी किल्ला असल्याचे कर्जत आणि पुण्यातील दुर्गप्रेमी मित्रांच्या शोध मोहिमेतून समोर आले आहे. काळाच्या प्रवाहात हरवलेला साबईगड हा एक गिरिदुर्ग असल्याची माहिती कर्जत आणि पुण्यातील दुर्गप्रेमींनी दिली व एक अप्रकाशित किल्यावर प्रकाश टाकला आहे. हा किल्ला टेहळणीचा असल्याचे अनेक भेटी देत तसेच माहिती गोळा करत या दुर्ग प्रेमींनी ही शोध मोहिम इतिहास अभ्यासक तसेच दुर्ग तज्ज्ञांसमोर मांडले आहे.

पुण्यातील निहार श्रोत्री, तसेच कर्जत येथील मंदार लेले, अभिजित मराठे, शर्वरीश वैद्य, कौस्तुभ परांजपे आणि भाविक आव्हाड गेल्या वर्षी साबई डोंगरावर भटकंतीसाठी गेले असता हा एक धार्मिक डोंगर असून येथे एक देवीचे मंदिर आहे अशी जुजबी माहिती मंदार लेले आणि निहार श्रोत्री ह्यांना स्थानिकांकडून मिळाली होती. परंतु या डोंगरावर त्यांना अनेक दुर्ग स्थापत्य अवशेष आढळून आले. गडाचे भौगोलिक स्थान हे अक्षांश १८.८४५९६३ रेखांश ७३.२९०२०७ असून चौक जवळील माणिकगडा पासून याचे अंतर १८ कि.मी., इर्शाळगड १४ कि.मी., सोंडाई किल्ला १७ कि.मी. तर कर्जत तालुक्यातील सोनगिरी किल्ला हा ७ कि.मी. अंतरावर आहे.

या दुर्गप्रेमींनी शोधलेला साबईगड हा खालापूर आणि कर्जत



तालुक्यांच्या सीमेवर असून वर जाण्यासाठी खालापूर तालुक्यातील कलोते या गावातून वाट आहे. गडावरील चढाई सोपी असून जायला तीन वाटा आहेत. प्रामुख्याने सोपी आणि पहिली वाट कलोते गावातून थेट गडावर जाते, दुसरी वाट ही गावाजवळील माधवबाग आयुर्वेदिक केंद्राच्या मागून गडावर जाते आणि तिसरी वाट ही खालापूर फाट्याजवळून गडावर जाते. डोंगरावर साबई मातेचे धार्मिक स्थान असून देवीची मूर्ती तांदळा स्वरूपातील आहे. साबई डोंगरावर दुर्ग स्थापत्याच्या अंगाने असलेले अनेक अवशेष आढळून आले आहेत. त्यात एका पाषाणावर वीर देवाची कोरीव मूर्ती असून अनेक ठिकाणी खडकात ओळीने कोरीव पायऱ्या आहेत.

साबई देवीच्या ठिकाणाहून डावी कडून पुन्हा पंधरा पायऱ्या बालेकिल्ल्यावर जातात. गडमाथा चिंचोळा आहे. गडावर टेहाळणीची जागा असून तिथे बांधकामाचे जोते दिसून येते. तसेच पाण्याची टाकी देखील आढळून आलेली आहे. गडा माथ्यावरून सोंडाई, माणिकगड, सोनगिरी, इर्शाळ ह्या किल्ल्यांप्रमाणे राजमाची, प्रबळगड, ढाकबहिरी हे सुद्धा किल्ले नजरेच्या टप्प्यात येतात. साबईगडा जवळूनच बोरघाटाला जाण्याचे रस्ते आहे. त्यामुळे ह्या गडाचा प्रामुख्याने वापर हा चौकी पहारा देणे तसेच टेहेळणी इत्यादी साठी झालेला असण्याची शक्यता आहे. पुणे आणि कर्जत येथील या गिरिप्रेमी मंडळींनी केलेल्या संशोधनातून खालापूर तालुक्यातील साबई गड हा फक्त धार्मिक डोंगर नसून तो एक गिरिदुर्ग असून त्याचा टेहेळणीचा किल्ला म्हणून उपयोग झाला असल्याचे समोर आले आहे. मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या १९ व्या गिरिमित्र संमेलनात साबईगडाचे अभ्यासपूर्ण सादरीकरण करण्यात आले असून या मोहिमेला ट्रेकक्षितिज संस्थेचे अमित सामंत, पुण्यातील इतिहास अभ्यासक प्र. के. घाणेकर तसेच नाशिक मधील दुर्ग अभ्यासक गिरीश टकले यांचे मार्गदर्शन लाभले. या शोधमोहिमेमुळे महाराष्ट्राच्या गड-किल्ल्यांच्या यादीत एका गिरिदुर्गाची भर पडली आहे हे विशेष होय.

## संक्षिप्त...

### अल्पवयीन मुलीबरोबर केले अश्लील चाळे; गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ११ वर्षीय अल्पवयीन मुलीचे तोंड रुमालाने बांधून तिच्या शरीराशी अश्लील चाळे करणाऱ्या एका ५० वर्षीय इसमाविरुद्द खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर १० पाण्याच्या टाकीजवळील झोपडपट्टीत राहणारी ११ वर्षीय अल्पवयीन मुलगी हि घरी एकटी घरात असताना त्यांच्या बाजूला राहणारा ५० वर्षीय आरोपी नूर अनारुल हुसेन ने तिच्या घरात येऊन तिच्या तोंडाला दाबून जबरदस्तीने उचलून घेऊन स्वतः च्या घरी आणून तिच्या तोंडाला रुमालाने बांधून सदर आरोपीने स्वतःचे तसेच सदर मुलीचे कपडे काढून तिच्या शरीरावर हात फिरवून तिचे चुंबन घेतल्याने या बाबतची तक्रार खारघर पोलिसाने पोलीस ठाण्यात देण्यात आली. या घटनेची तात्काळ दखल घेत त्याच्या विरुद्ध भादवि कलम ३६३ सह बालकांचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ८ व १० अंतर्गत गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले.

### सुहासिनी सुभेदार यांची शिवसेनेच्या मुरुड शहर संघटिका पदी निवड

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुडमध्ये शिवसेनेच्या शहर संघटिका पदी सौ. सुहासिनी कृष्णा सुभेदार यांची शहर संघटिका पदी निवड झाल्याबद्दल तमाम शिवसैनिकांनी आनंद व्यक्त केला.

शिवसेनेचे जेष्ठनेते प्रमोद भायदे, शहरप्रमुख आदेश दांडेकर, उप शहरप्रमुख प्रशांत कासेकर, उपशहरप्रमुख विजय वाणी, तालुका युवा अध्यक्ष कुणाल सतविडकर, माजी नगरसेविका अनुजा दांडेकर, रुपेश जामकर, योगेश सुर्वे, मोहन पाटील, राहुल कासार, देवेंद्र सतविडकर, अविनाश दांडेकर, प्रतिक उमरोटकर, सुनील शेळके आदी.नी शहर शिवसेनेच्या वतीने सुहासिनी सुभेदार यांच्या निवासस्थानी भेट घेऊन शिवसेनेच्या मुरुड शहर संघटिका पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करुन पुढील यशस्वी कारकिर्दिसाठी शुभेच्छा दिल्या.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# माणगांव तालुका प्रेसक्लबने केला आदर्श शेतकऱ्यांचा बांधावर जावून सन्मान



**दै.रायगड नगरी । माणगाव**

रायगड जिल्हा प्रेसक्लब आयोजित माणगांव तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून दरवर्षी शेताच्या बांधावर जाऊन देण्यात येणारा आदर्श शेतकरी व प्रगतशील शेतकरी हा पुरस्कार २०२२ या वर्षी इंदापुर विभागातील भुवन या ग्रामपंचायतीमधील मु.विठ्ठल नगर या गावातील प्रगतशील शेतकरी चिंतामणी रावजी यादव, तसेच निवी मुठवळी ग्रामपंचायती मधील मु. उमरोली दिवाळी या गा-वातील प्रगतशील शेतकरी भोलीनाथ बाबू साळवी यांना दि.१७ जुलै रोजी भुवन ग्रामपचायतीच्या सरपंच दिशा जाधव, रायगड प्रेस क्लबचे सहसचिव पदमाकर उभारे, माणगांव तालुका प्रेसक्लब अध्यक्ष संतोष सुतार, कार्याध्यक्ष गौतम जाधव, उपाध्यक्ष आरती म्हामुणकर, खजिनदार सचिन वनारसे, सचिव हरेश मोरे, विनोद सापळे, पुनम धूमाळ, माणगांव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते लोक शाहीर गोंविद शिंदे, पाणसईचे माजी सरपंच विलास शिंदे, अकुश उडरे, माजी उपसरपंच नितिन शिर्के, सदस्य भास्कर यादव, राम येलकर तसेच विठ्ठल नगरचे ग्रामस्थ यावेळी मोठ्या संखेने उपस्थिती होते.

तसेच इंदापुर विभागातील उमरोली दिवाळी या गावचे प्रगतशिल शेतकरी भोलीनाथ साळवी यांना देखील पुरस्कार देताना युवा क्रांती संघ (रंजि) डेव्हलपमेंट सेटरचे अध्यक्ष संदेश सोनावणे, सकल्पना संस्थापक, सुनील कदम, नितिन साळवी यावेळी उपस्थित होते. तसेच विठ्ठल नगर येथील रायगड भुषण पुरस्कार प्राप्त गोंविद शिंदे यानी आ-पले मनोगत व्यक्त करताना म्हाणाले की आमच्या गावातील प्रगतशील शेतकरी चिंतामणी यादव यांना मिळालेला आदर्श पुरस्कार तो त्यांना मिळालेला नसून तो समस्त विठ्ठल नगर ग्रामस्थाना मिळाला असे मला वाटत असून रायगड प्रेस क्लब तसेच माणगांव तालुका प्रेस क्लबच्या उपक्रमा बाबत आम्ही त्यांचे खूप खूप आभार मानत आहोत.

# मार्केट यार्ड कडे जाणारा रस्ता खड्ड्यात ; वाहन चालकांना मनस्ताप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील मार्केट यार्ड कडे जाणारा रस्ता खड्ड्यात गेला आहे. मोठमोठ्या खड्डे पडल्याने वाहने कसे चालवायची असा यक्षप्रश्न येथे येणाऱ्या वाहन चालकांना पडला आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड रोडवरील रेसिडेन्सी सोसायटीच्या समोरील रस्ता हा वरदळीचा रस्ता आहे. सकाळी मोठ्या प्रमाणात वाहने येथून येजा करतात. मात्र मोठमोठे खड्डे या रस्त्यावर पडल्याने वाहन कुठून चालवायचे असे प्रश्न वाहन चालवताना व नागरिकांना सतवत आहे.

पनवेल महानगरपालिका झालेली असली तरी देखील बरेचशे रस्ते खड्ड्यातच आहेत. पनवेल शहराला खड्डे मुक्त करून नागरिकांना होणाऱ्या त्रासातून मुक्तता करावी अशी मागणी पनवेलकर करत आहेत.

मार्केट यार्ड कडे जाणारा रस्ता हा महत्त्वाचा रस्ता आहे सकाळी भाजी विक्रेते तसेच भाजी विकत घेणारे नागरिक मोठ्या प्रमाणात या रस्त्याचा वापर करतात खड्डे मुक्त रस्त्याचा मनस्ताप वाहन चालकांना होतो परिणामी वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. असे असले तरी देखील पनवेल महानगरपालिका खड्डे बुजवण्यासाठी काहीही करत नसल्याचे समोर आले आहे



# पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात भात लावणीच्या कामांना वेग

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

नेहमीप्रमाणे शेतकऱ्यांनी मृग नक्षत्राच्या मुहूर्तावरती आपल्या शेतामध्ये भात पेरणी केली होती. पावसाने देखील वेळेवर सुरुवात केली. परंतु जून महिन्यात अत्यल्प पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांना उगवलेल्या भाताला खताचा डोस देता आला नाही. त्यामुळे भारताचा रुजवा कमी प्रमाणात झाला होता. मात्र जुलै महिन्यात पावसाला चांगल्याप्रकारे सुरुवात झाल्यानंतर शेतकऱ्यांनी भाताच्या रोपांना खताचा डोस दिल्यानंतर, आता भात लावणी योग्य झाल्यानंतर पावसाचे प्रमाण देखील काही प्रमाणात कमी झाल्याने शेतकऱ्यांनी लावणीच्या कामाला सुरुवात केली आहे. तालुक्यात एकुणच आढावा घेतला असता सध्या बैलांचे नांगर अत्यल्प प्रमाणात दिसून येतात.

कारण पावसाळ्यात फक्त नांगरणीसाठी बैल वापरणे आणि वर्षभर त्या बैलाला पोसणे शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे बहुतांश शेतकरी ट्रॅक्टर किंवा पावर टिलर याचा वापर करून आपल्या शेतामध्ये नांगरणी करताना दिसत आहेत. ट्रॅक्टर व पावर टिलर भाड्याने मिळत असल्याने शेतकऱ्यांना देखील ते परवडतात. परंतु या वर्षी डिझेलने देखिल शंभरी पार केली असून शेतकऱ्यांना शेतातील नांगरणी देखील महागात पडणार आहे.

तालुक्यातील खेडे गावातील लोक नोकरीधंद्यासाठी मुंबईसारख्या शहरात राहायला गेल्याने गावाकडची शेती गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून ओसाड टाकत आहेत. त्यामुळे तालुक्यात असलेल्या एकूण भात शेतीपैकी फक्त पन्नास टक्केच भात शेती लागवड केली जाते. एकंदरीतच जुलै महिन्यात झालेल्या चांगल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी आपल्या लावणीच्या कामांना चांगली सुरुवात केली आहे व बळीराजा सुखावल्याचे पाहायला मिळत आहे.

# सर्पमित्र संदीप घरत यांनी दिले कवड्याजातीच्या सापाला जीवदान

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड-माझेरी येथिल नर्गिस रेस्टॉरंट येथे भक्ष्याच्या शोधात आलेल्या कवड्या जातीच्या बिनविषारी सापाला सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून वनखात्याच्या मदतीने सुरक्षितपणे पकडून जवळील जंगलात सोडून दिल्याबद्दल कौतुक होत आहे.

कवड्या साप हा एक बिनविषारी साप असून पाली-सरडे झुरळ खाण्यासाठी हा साप मानवी वस्ती जवळ येतो. साप रंगाने गडद तांबडा असला तरी त्यावर पांढऱ्या रंगाच्या आडव्या पट्ट्या असतात त्यामुळे हा साप कवड्याची माळ घातल्याप्रमाणे भासतो. हा साप बऱ्याचदा दिसतो. दिसायला मण्यार सारखा असल्यामुळे पाहताक्षणी लोक गोंधळात पडतात. त्यामुळे नागरिकांनी असा साप दिसल्यास न घाबरता वनखात्याशी संपर्क साधावा. असे आवाहन सर्पमित्र संदीप घरत यांनी केले आहे.

# दमदार पावसामुळे भात लागवडीस दमदार सुरुवात

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून पावसाने धो धो बरसायला सुरुवात केल्याने शेतकरी राजाचा चेहरा आनंदित झाला. त्यामुळे पावसाच्या दमदार आगमनाने लावणीच्या कामाला देखील दमदार सुरुवात झाली असल्याचे दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार असे म्हणतात.त्याचप्रमाणे रोहा तालुक्यात दुबार भातशेती पिकविली जात असल्याने रोहा तालुक्याला देखील भाताचे कोठार म्हणले तर वावगे ठरणार नाही येवढ्या मोठ्या प्रमाणात भातशेती पिकविली जाते.या वर्षी मान्सून वेळेवर सुरू ध झाल्याने पेरणीची कामेही योग्य वेळेत व योग्य कालावधीत पुर्ण होऊ शकली नाहीत.तर जुलै महिन्याच्या सुरुवातीपासूनन चांगल्या स्वरूपात पाऊस पडल्याने भाताची रोपेही योग्य पद्धतीनेलागवडीस योग्य झाल्याने शेतकरी वर्गही सुखावला आहे.तर जून महिन्यात दडी मारून बसलेल्या पावसाने जुलै महिन्यात बरसायला सुरुवात केल्याने झाल्याने शेतकरी वर्गाने लावणीच्या कामाला प्रारंभ केला आहे.गत वर्षी कोरोना काळात व्यापार उद्योग बंद झाले होते. हा-ताला काम नव्हते.त्यामुळे शेती क्षेत्रालाही त्याचा फटका सहन करावा लागला होता.



परंतू या वर्षी मात्र पावसाळी भात लागवडीचे कामाने चांगला वेग घेतला असल्याने या पुढे रोह्यात शेती बहरणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.पुर्वी न परवडणारी शेती आता भाताला चागला भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गाचे चेह-यावर समाधान दिसून येत आहे.शेती क्षेत्रातून चांगले उत्पादन मिळावे यासाठी शेतकरी वर्ग नविन विकसित बियाण्यांचा वापर करित असल्याने तांदूळ सुद्धा चांगल्या प्रतिचा मिळत आहे.त्यामूळे अनेक वर्षानंतर भातशेतीला पुन्हा एकदा महत्व आले आहे. यामध्ये कृषी खात्याचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे. यंदा पाऊस चांगला बरसत असल्याने शेतकरी आनंदित झाला आहे. कोरोना महामारी तसेच अन्य नैसर्गिक आपत्तींचा सामना करीत असताना देखील शेतकरी जराही विचलित न होता शेती क्षेत्राला प्राधान्य देऊन आपली उपजीविका करीत असताना दिसून येत आहे.

# पोलादपूर शहरातील हनुमान नगरमध्ये टँकरने दूषित पाणीपुरवठा

## नगरपंचायतीच्या विरोधी गटनेत्यांकडून तीव्र आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरकडून गेल्या काही दिवसांपासून जयहनुमाननगर भागातील रहिवाशांना गढूळ तसेच अस्वच्छ पाणीपुरवठा होत असून अलिकडेच टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना प्रमाणाबाहेर जलशुध्दीकरणाचे द्रव टाकल्यामुळे पाण्याला उग्र वासही येऊ लागला असल्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. याप्रकरणी पोलादपूर नगरपंचायतीचे विरोधी गटनेते दिलीप भागवत यांनी सत्ताधारी नगरसेवकांना टँकरद्वारे उपलब्ध होणारे पाणी पिण्याचे आवाहन करून शुध्द पाणी मिळेपर्यंत जयहनुमाननगरच्या ग्रामस्थांसोबत आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या जुन्या नळपाणीपुरवठा योजनेची जॅकवेल गेल्या वर्षी अतिवृष्टीदरम्यान वाहून गेल्यानंतर आजमितीस त्याजागी दुसरी जॅकवेल उभारण्यात आली नसल्याने नवीन विस्तारीत नळपाणीयोजनेच्या पाईपलाईनमधून पाणीपुरवठा पोलादपूर शहरामध्ये केला जात असतो. मात्र, चौपदरीकरणाच्या कामादरम्यान प्रभातनगर भागामध्ये पाणी तुंबल्यानंतर ते काढण्यासाठी नवीन विस्तारीत नळपाणीयोजनेच्या पाईपलाईनचे जेसीबीमुळे नुकसान झाले असल्याने हा विस्तारित पाणीपुरवठ्याचा प्रश्न अधिकच बिकट झाला आहे. पोलादपूर शहरातील हनुमाननगर ही कष्टकरी जनतेची वसाहत असून याठिकाणी काही दिवसांपासून दूषित पाणी पुरवठा करण्यात आल्याने सुमारे १०-१५ आबालवृध्दांना आरोग्याच्या समस्या उदभवल्याने उपचारासाठी रूग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असल्याची माहिती स्थानिकांनी यावेळी दिली. याप्रसंगी स्थानिक नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आलेले नगरपंचायतीमधील विरोधी गटनेते दिलीप भागवत आणि नगरसेवक निखिल कापडेकर यांनी नगरपंचायतीमार्फत पाठविण्यात आलेल्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना ब्लिचिंग पावडरचे प्रमाण अतिरिक्त ठेवल्याने हे पाणी पिण्यालायक राहिले नसून दुषित पाण्यामध्ये असे ब्लिचिंगपावडर टाकलेले पाणी पिण्यासाठी सत्ताधारी नगरसेवकांना आग्रह करून स्थानिक नागरिकांसोबत ठिय्या देण्याचा इशारा यावेळी नगरपंचायतीमधील विरोधी गटनेते दिलीप भागवत यांनी दिला.

# प्लास्टिक कचऱ्याने गुरांचे आरोग्य धोक्यात ; डम्पिंग ग्राउंडवर प्लास्टिकचे ढीग

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत, त्यातच पाली सुधागड सह संपूर्ण जिल्ह्यात मोकाट गुरे हे आपले खाद्य हे कचरा कुंड्या व डम्पिंग ग्राउंडवर शोधत आहेत.

मागील अनेक वर्षांपासून सुक्या चार्यांचा देखील अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे मोकाट जनावरांना खाण्यासाठी अन्नाची कमतरता भासू लागली आहे. ही मोकाट गुरे सध्या सर्वत्रच कचराकुंड्या व उकिरड्यावर जावुन मिळेल ते खात आहेत. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय स्वच्छतेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे. पालीतील जुने पोलीस स्थानक, कुंभारआळी, बाजारपेठ, मधली आळी, बल्लाळेश्वर मंदिर, महाकाली मंदिर परिसर, मिनिडोअर स्टॅन्ड, भोईआळी, आगर आळी या ठिकाणी कचरा कुंड्यांवर सकाळ पासूनच मोकाट गुरांची गर्दी असते. येथे टाकलेला कचरा ही गुरे अस्ताव्यस्त करतात ,त्यामुळे येथे घाण व दुर्गंधी पसरते. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात येते. बर्याचवेळा टाकुन दिलेले अन्न पदार्थ पिशव्यांमध्ये असते. याचे नागरिकांना भान नसते. परिणामी गुरांच्या पोटात कमी अधिक प्रमाणात प्लास्टिक जाते. प्लास्टिक व सडके आणि कुजलेले अन्न पदार्थ खाऊन या जनावरांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. त्यांची पचनशक्ती मंदावते, अन्नाच्या शोधात सतत चालल्याने त्यांची ऊर्जा कमी होते. अशक्तपणा येतो. कचराकुंड्या मध्ये व उकिरड्यावरील कचऱ्यात धातू तसेच धारधार वस्तू उदा. घरगुती वापराची सुई, इंजेक्शनच्या सुय्या आदी घटक असतात. त्या पोटात गेल्यामुळे जनावरांच्या जठराला व अन्न नलिकेला इजा पोहचते. सतत प्लास्टिक खाल्लयामुळे ते त्यांच्या पोटात साठते.

त्यामुळे गुरे मरतात देखील. काही वेळेस अशा मेलेल्या गुरांची हाडे इतर गुरे आणि प्राणी चघळतात व पर्यायाने त्यामुळे त्यांचा देखील मृत्यू होतो आणि हे दुष्टचक्र सुरूच राहते. पालीचे उपनगराध्यक्ष आरिफ मणियार यांच्या म्हणण्यानुसार गुरांना पावसाळ्यात हिरवा चारा उपलब्द करून द्यावा, शेतकरी किंवा गुरेमालक आपली गुरे चरण्यासाठी मोकाट सोडून देतात. शासनाने मोकाट गुरांच्या चारा पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. तसेच पशुपालकांना यासाठी अनुदान दिले पाहिजे.

